Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लोकशाही संबधी विचार

**प्रा.डॉ.अंकुश अंबादास चव्हाण**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
मत्स्योदरी कला महविद्यालय,
तीर्थपुरी,ता.घनसावंगी जि.जालना

आधुनिक भारतीय विचारांच्या जडणघडणीत डॉ.आंबेडकरांचा मोठा वाटा आहे.देशातील ७० लक्षाहून अधिक दलितांना समान मानवी प्रतिष्ठा मिळाली पाहिजे हा आग्रह त्यांच्या व्यक्तिमत्वातून मूर्तिमंतपणे साकार झाला.आंबेडकरांचे वैशिष्ट्य असे कि त्यांनी हिंदू सामाजिक श्रेणीतील सर्वात कनिष्ठ अशा एकाच स्तरावर आपले लक्ष केंद्रित केले आणि त्यांच्या हक्कासाठी प्रस्थापिताविरुद्ध सर्वच पातळ्यावर लढा दिला ते एक श्रेष्ठ न्यायपंडीत कुशल कायदे पंडित आणि धडाधडीचे व बुद्धिमान राजकीय नेते म्हणूनही त्यांचा लौकिक आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक तत्वचिंतक व समाज सुधारक होत सामाजिक जीवनात वेळोवेळी निर्माण होणाऱ्या प्रश्नांचा शास्त्रसुद्ध पद्धतीने व सखोल अभ्यास करून त्यावर ते भाष्य करीत भारतीय समाजात अतिशूद्र समजल्या जाणाऱ्या युगायुगाने खितपत पडणाऱ्या वंचित वर्गात आत्मतेज,आत्मविश्वास आणि नवचैतन्य निर्माण करण्याचे कार्य डॉ.बाबसाहेब आंबेडकरांनी केले.दलितांचा कैवारी,दलितांचा पुढारी,कष्ट करणारा पंडित आदी उपाधी त्यांना दिल्या जातात.तसेच ते थोर विद्याप्रेमी आणि आयुष्यभर ज्ञानाची युपासना करणारे होते.विद्या,विनय,व शील हि त्यांची तीन उपास्थ दैवते होती.ज्ञानाने मनुष्य गर्विष्ठ बनता कामा नये तर तो विनयशील बनला पाहिजे आणि माणसाने शीलही पवित्र ठेवले पाहिजे असे ते म्हणत.शोषित वंचित वर्गासाठी त्यांनी केलेले कार्य महान आहे.

डॉ.आंबेडकरांच्या राजकीय विचारात प्रामुख्याने लोकशाहीची भारतातील प्रस्तुत संसदीय प्रणाली,द्विपक्ष पद्धती,यावर भर आणि राष्ट्रीय एकात्मते संबधीच्या विचाराचा समावेश होतो.त्यांनी आपल्या जीवनात राजकारणापेक्षा समाज कारणाला महत्व दिले.परंतु तिसऱ्या गोलमेज परिषदेनंतर मात्र सामाजिक सुधारणा बरोबरच राजकीय सुधारणाचाही जाहीर पुरस्कार करण्यास आंबेडकरांनी सुरुवात केली १९४० पासून महत्वाच्या राजकीय प्रश्नाकडे त्यांनी लक्ष दिले असल्याचे दिसते. भगवान बुद्ध, संत कबीर आणी ज्योतिबा फुले यांना ते गुरु मानत त्यांनी आपल्या विचारात सामाजिक समतेचा आग्रह धरला आपल्या विचारासाठी त्यांनी हिंसाचार,दडपशाहीचा मार्ग स्विकारला नाही.

१) लोकशाही :-

लोकांचे लोकांसाठी आणि लोकांनी चालवलेले राज्य अशी सर्व सामान्य लोकशाहीची व्याख्या असून सरकार सार्वत्रिक मताच्या आधारानेच निर्माण होऊ शकेल असे पाश्चत्य

विचारवंताना वाटे परंतु आंबेडकरांना प्रौढ मतदादानाच्या सहायाने लोकांचे राज्य स्थापन करता येणे शक्य होईल असे वाटत नसे. कारण आंबेडकर म्हणतात, लोकशाहीत सामाजिक परिस्थितीला अत्यंत महत्वाचे स्थान असते.पाश्चात्यसारखी सामाजिक व्यवस्था नसल्यामुळे त्यांच्यासारखी लोकशाही या देशात निर्माण होणे कठीण आहे.असे असले तरी लोकशाहीच्या विकासासाठी आंबेडकर तळमळीने विचार करतएका माणसाला एक मत असे विचार त्यांनी लोकशाहिच्या संदर्भात व्यक्त केले होते.लोकशाही सरकार नेहमीच जनतेच्या टीकेवर अवलंबून असते आणि अशी टीका लोकशाहीवर झालीच पाहिजे सरकार बदलण्याचे अधिकार जनतेला असावेत असे आंबेडकर म्हणत पाश्चात्य लोकशाही आणि भारतीय लोकशाही यात फरक राहणारच, लोकशाहीचे स्वरूप कालमान परिस्थिनुसार बदलत असते.एकाच देशात आहे त्या स्थितीत ती कायम राहू शकत नाही कारण तिचे उद्देश बदलत असतात.वर्तमान काळातील लोकशाहीचे ध्येय लोकांचे कल्याण साधने हेच असल्यामुळे तिचे स्वरूप बदलणे अपरिहार्य ठरते.लोकशाहीची व्याख्या ते पुढील प्रमाणे करतात.ज्या सरकार पद्धतीत लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात क्रांतिकारक स्थित्यंतरे रक्तपाताशिवाय घडवून आणता येतात ती लोकशाही होय.

आंबेडकरांच्या मते व्यक्तीनिष्ठा आणि व्यक्तिपूजा या बाबी लोकशाहीस मारक ठरतात अतिरेकी व्यक्ती निष्ठेतून लोकशाहीचा लोप होऊन हुकुमशाहीचा मार्ग प्रशस्त होतो लोकशाही म्हटल्यास राजकीय पक्ष आले, परंतु एकच पक्ष जर अतिबलवान होत असेल तर ते मात्र लोकशाहीस मारक आहे.लोकशाहीत तुल्यबळ असे किमान दोन पक्ष असणे आवश्यक आहे.स्वातंत्र्यपूर्वीच भारतात लोकशाहीची सुरुवात ब्रिटीश सुधारणा मार्फत होऊ लागली होती.परंतु तेंव्हा लोकमान्य असा एकच कॉंग्रेस पक्ष होता.या स्थितीबद्दल आपली नापसंती व्यक्त करतांना ते लिहितात,या देशात लोकशाही आहे पण या लोकशाहीने बुद्धी, निष्ठा सोडली आहे.या लोकशाहीचे हात,पाय एकच एक संघटनेला घट्ट जखडून टाकले आहेत.या संघटने संबंधी काही बोलण्यास हि लोकशाही असमर्थ आहे मला वाटते हि एक दुखः दायक बाब आहे हा एक भयंकर रोग एक बिमारी आहे.

*लोकशाही तत्वे :-

लोकशाहीच्या यशासाठी खालील तत्वाची आवश्यकता आहे.असे आंबेडकरांचे मत होते.

१) सामाजिक समानता आणि सामाजिक रचनेत शिथिल बंधने निर्माण करण्यात यावीत.

२) मतभेदाचे प्रदर्शन करण्यासाठी विरोधी पक्षाचे अस्तित्व मान्य केले पाहिजे व त्या मार्फत शासनाच्या चुका दाखवता आल्या पाहिजे.

३) कायदा व प्रशासनात समानता.

४) राजकीय व्यवहार घटनारूप होतील याची काळजी घेण्यात आली पाहिजे.

५) सार्वजनिक सदसद्विवेक बुद्धी जागृत करण्याचे प्रयन्त केले पाहिजे.

६) बहुसंख्याकांचे अनियंत्रित वर्चस्व वाढता कामा नये.

७) जागरुकता निर्माण केली पाहिजे, मानवी समानता धर्मनिरपेक्ष विचारसरणी हा लोकशाहीचा आत्मा असतो.जनतेला लोकशाहीत अधिकाधीक न्याय आणि स्वातंत्र मिळावे अशी त्यांची इच्छा होती.

*संसदीय लोकशाही :-

समाजहित आणि व्यक्तीहीत विरोध न विरोध न होता सर्वसामान्य जनतेचा विचार करण्यासाठी डॉ.आंबेडकरांनी जगातील सर्व लोकशाही पद्धतीचा अभ्यास करून ब्रिटनची संसदीय पद्धतीची लोकशाही,व्यक्ती हित आणि समान हितांचा जास्तीत जास्त विचार करणार आहे असे मत व्यक्त केले होते.भारतात हि संसदीय पद्धतीची लोकशाही असावी असे त्यांचे मत होते.परंतु त्यासाठी योग्य ती परिस्थिती निर्माण केली पाहिजे.संसदीय लोकशाहीसाठी आवश्यक सामाजिक क्षमता, राष्ट्रप्रेम, जनतेचे अज्ञान, दारिद्र्य, विषमतेवर आधारित सामाजिक व्यवहार,अल्पसंख्याकांचा प्रश्न आदी प्रश्नांचे स्वरूप भारतीय आहे,त्यामुळे भारतात सासंदीय लोकशाही यशस्वी होईल,किंवा नाही सांगता येणार नाही असे आंबेडकर म्हणतात.

*राज्यघटना :-

आंबेडकर म्हणतात भारताची राज्यघटना जनतेतून निर्माण झाली आहे.जनतेची घटनेला मान्यता आहे आणि जनताच उचलून धरीत आहे एका पिढीला मान्य असलेली घटना पुढील पिढीला मान्य असेल अथवा नाही हे तिच्या अंमलबजावणीवर अवलंबून आहे असे आंबेडकरांना वाटते.घटनेची पार्श्वभूमी काहीही असली तरी घटनेचे मोजमाप करणारी ही पट्टी असते ती पट्टी सरनामा मार्गदर्शक असते.घटनेतील तरतुदी चांगल्या की वाईट हे या सर्मामान्यावरून ठरविता येते.भारताच्या राज्यघटनेसाठी आंबेडकरांनी जी मेहनत घेतली होती एवढेच नव्हे तर ती राज्यघटना सरस ठरावी यासाठी आंबेडकरांनी जो चौकसपणा दाखविला होता त्यावरून घटना समितीच्या पुष्कळ सभासदांनी त्यांना आधुनिक मनु संबोधले होते.

*एकात्मक शासन प्रणाली :-

लोकशाहीतच लोकांचे हक्क सुरक्षित राहतात आणि लोककल्याण साधता येते. यावर आंबेडकरांचा विश्वास होता, पण या गोष्टी साध्य होण्यासाठी शासन हे सामर्थ्यवान असले पाहिजे असे ही त्यांना वाटे संघटनात्मक शासन दुबळे असते, असे त्यांचे मत होते.आणि म्हणूनच त्यांनी १९३६ च्या इंडिया ॲक्टने निर्माण केलेल्या संघटनात्मक प्रणालीमुळे देशातील लोकशाही विकासाच्या प्रक्रियेस खीळ बसेल त्यामुळे भारतीय संस्थानांचे लोकशाहीकरण थांबेल आणि शेवटी मानवी स्वातंत्र्यस आणि दरिद्री माणसाच्या दारिद्र्य मुक्तीस तो एक भयंकर धोका ठरेल,अशी टीका केली.या उलट आंबेडकरांना असे वाटते कि एकात्मप्रणाली हि लोकांच्या संघटीत आकाक्षांचे प्रतिनिधित्व करीत असल्यामुळे असे शासन सामर्थ्यवान आणि कार्यक्षम असते. भारतातील एकंदर परिस्थीचा विचार करता येथे असेच शासन हवे असे त्यांना वाटे प्रादेशिक स्वायतत्ता हा एक अर्थहीन शब्द प्रयोग आहे. असे ते म्हणतात.

**भारतीय परिस्थितील लोकशाहीची प्रस्तुतता :-**

भारतातील सामाजिक व आर्थिक विषमता लोकशाहीला पोषक नाही असे आंबेडकरांचे मत होते. विशेषता येथील सामाजिक सुधारणा व्हाव्यात असा असा त्याचा आग्रह होता राजकीय सत्तेची घडण नंतर होते. मानवी हक्क त्या आधी येतात. भारतीय परीस्थित जेथे संपूर्ण समान असून माणसाच्या निष्टा आणि हित संबंधाना जातींय मर्यादा आहेत तेथे कोणतेही लोकशाही शासन हे जातीय किंवा सांप्रदायिक बहुसंख्याकांचे राज्य बनणार हे उघडच आहे . अशा प्रकारचे बहुमत हे समाजातील सर्व संबंध फारसे नाहीत येथे खुला आणि परिपूर्ण असा आंतर व्यवहार नाही. समाजातील विविध स्तरांना एकत्र आणतील असे सहभागीत्वाचे फारसे कार्यक्षेत्र नाहीत.

भारतात स्वराज्य मिळण्यापूर्वी येथे ज्ञानसागर होणे लोक जागृती होणे समाजातील कनिष्ठ घटकांचे उत्थान होणे तसेच त्यांना मुलभूत मानवी हक्काची हमी मिळणे, आवश्यक आहे. या गोष्टीची पूर्तता होण्यापूर्वी अन्याय आणि यातना राजकीय संस्थातून पुढे तशाच चालू राहणार नाहीत अशी व्यवस्था करा अशी विनंती ब्रिटीशाना त्यांनी केली होती.

**संदर्भग्रंथ :-**

१) भारतीय राजकीय विचार - प्रा. किसन चोपडे
विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद २००२, पृ. क्र. १७७, १७८
२) साठ महामानव - प्रा. सौ. माधवी कवी
विद्या भारती प्रकाशन - लातूर २०१०, पृ. क्र. १२३
३) भारतीय समाज सुधारक व विचारवंत - व्ही. एन. स्वामी
विद्या भारती प्रकाशन - लातूर पृ. क्र. ६१, ६२
4) See D. Keer, Dr. Ambedkar : Life and Mission (Bombay), 2nd edn 1962 P. 442
5) Ambedkar Times of India January 4, 1938
6) B.R. Ambedkar, State and Minorities, Bombay, 1947, P.3
7) Ambedkar Fedration Versus Freedom, Poona 1939, P.137, 140, 151
8) B.R. Ambedkar, Pakistan or Partition of India, Bombay 3rd 1949m P.13
9) B.R. Amedkar, Ranade, Gandhi and Jihhan, P.32
10) B.R.Ambedkar, Mr.Gandhi & The Emancipation of Untouchables, Bombay, 1934, P.24-30
11) B.R.Ambedkar - Evidence Before The Reforms Committee Vol.II Calcutta, 1919,PP, 729,739